# पंचगव्य



— आचार्य प्र. के. अत्रे

— दत्तु बांदेकर



कविद्वय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत.
अनुक्रम .................... दि ....................
क्रमांक .................... नों. दि ....................

# पं च ग व्य

# पंचगव्य

[ राजकीय विडंबन काव्य ]

90083

आचार्य अत्रे

दत्तु बांदेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23623 किं:
क्रमांक 9711 नों: दि:

REFBK-0010043

REFBK-0010043

प्रकाशन क्रमांक १६६

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गिरगांव, मुंबई ४

मूल्य अडीच रुपये

प्रकाशक :

**विष्णु गजानन परचुरे**
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ क्र. २
गिरगांव, मुंबअी ४

सर्वाधिकार सुरक्षित

पहिली आवृत्ति :
१३ ऑगस्ट १९५८

मुखपृष्ठ सजावट :
**शाम जोशी**

मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

मी आणि माझे सहकारी श्री. दत्तु बांदेकर ह्यांनीं 'संयुक्त महाराष्ट्रा'च्या आंदोलनाच्या काळीं 'नवयुगां'त लिहिलेल्या कांहीं राजकीय विडंबनांचा हा संग्रह आहे. मराठीमध्यें आतां वाङ्मयीन विडंबन-काव्यें पुष्कळच झालेलीं आहेत. पण राजकीय विडंबन-काव्यांचा हा बहुधा पहिलाच संग्रह आहे.

संयुक्त महाराष्ट्र हा तीन कोटी महाराष्ट्रीयांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. पण राज्यपुनर्रचना कमिशननें संयुक्त महाराष्ट्राच्या ह्या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावून महाराष्ट्रीयांच्या भावनांची क्रूर विटंबना करण्यास जेव्हां सुरुवात केली तेव्हां महाराष्ट्रांत काँग्रेसद्वेषाची एक प्रचंड लाट उसळली. यशवंतराव चव्हाण, भाऊसाहेब हिरे, काकासाहेब गाडगीळ, आणि शंकरराव देव हे काँग्रेसचे थोर थोर पुढारी प्रारंभीं 'संयुक्त महाराष्ट्रा'ची मागणी तारस्वरानें करणाऱ्यांपैकीं होते. पण संयुक्त महाराष्ट्राला पंडित नेहरूंचा विरोध आहे असें त्यांना दिसून येतांच, ही मंडळी हळूहळू संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांतून बाहेर पडली. जे शंकरराव देव 'मुंबई जर आम्हांला मिळाली नाहीं तर पांच मिनिटें मी जगूं शकणार नाहीं' असें छातीवर हात मारून म्हणत होते ते नेहरूंनीं दमदाटी देतांच 'संयुक्त

महाराष्ट्र परिषदे 'ला टाळें लावून जे पसार झाले, ते पुढें द्विभाषिकवाद्यांच्या छावणींत जाऊन प्रकट झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या खुद्द 'सेनापती 'ची ही दशा, तर मग बाकीच्या काँग्रेस पुढाऱ्यांची काय अवस्था झाली असेल तें सांगायलाच नको. भाऊसाहेब हिरे आपले राजिनामे खिशांत तयार करून ते केव्हां द्यायचे ह्याच्या मुहूर्ताची तेवढी वाट पाहत बसले होते. पण तो मुहूर्त त्यांना कधीं सांपडलाच नाहीं. शेवटीं निराश होऊन ते म्हणाले, "प्राण गेला (म्हणजे लोकांचा) तरी आम्ही राजिनामे देणार नाहीं! संयुक्त महाराष्ट्र मिळाला नाहीं तरी बेहत्तर, पण तेवढ्यासाठीं काय आम्ही काँग्रेसमधून बाहेर पडूं म्हणतां? शक्य नाहीं!" यशवंतराव चव्हाण सगळ्यांत धूर्त. संयुक्त महाराष्ट्रासाठीं आपण कसे लढूं ह्याचा निर्वाळा त्यांनीं आपला लाल लंगोट दाखवून एकदां दिलेला होता. पण संयुक्त महाराष्ट्राचा कैवार घेण्याचें एकदां हातून घडलेलें तें पाप 'तीन कोटी मराठी माणसांपेक्षां पंडित नेहरू श्रेष्ठ आहेत!' अशी घोषणा करून यशवंतरावांनीं तावडतोब निस्तारून टाकलें. संयुक्त महाराष्ट्रासाठीं 'भारतीय युद्ध' करावयाला आपण तयार आहोंत आणि तेवढ्याकरतां सर्व 'शस्त्रें' आणून आपण तीं 'शमी 'च्या झाडावर ठेवून दिलीं आहेत अशी 'युद्धघोषणा' करून काकासाहेब गाडगीळांनीं सर्वांना पोट धरधरून हसविलें. मुंबई महाराष्ट्राला कालत्रयीं मिळूं नये ह्याबद्दल पाटलांनीं मोठा खटाटोप आरंभला होता. 'मुंबई महाराष्ट्राला पांच हजार वर्षें मिळणार नाहीं!' असें आव्हान 'पादत्राणां 'च्या वर्षावांत चौपाटीच्या वाळवंटावर त्यांनीं मराठी जनतेला दिलें. सारांश, काँग्रेसमधल्या भरंवशाच्या मराठी पुढाऱ्यांनीं संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीशीं विश्वासघात करून मराठी जनतेची फार क्रूर निराशा केली.

ह्या पार्श्वभूमीवर हीं सर्व विडंबन-काव्यें त्या त्या वेळीं लिहिलीं गेलीं असल्यामुळें त्यांना कमालीची लोकप्रियता लाभली.

आतां मराठ्यांनो, उठा
हातांत घ्या काळें निशाण,
ते दोन मंत्री बेइमान
आले हिरे! आले चव्हाण!

ह्या कडव्याचे निनाद घराघरांतून उठूं लागले. शंकरराव देवांना पाहिलें कीं

असा कसा देवाचा 'देव' बाई ठकडा,
देव एकं पंचानें उघडा!

हें गाणें गुणगुणलें जाऊं लागलें. गणपतराव तपाशांची मोटर रस्त्यांतून दिसूं लागली कीं

गण्या गण्या गणपति
पगार भत्ता खातो किती?

अशा आरोळ्या उठूं लागल्या. हिरे, चव्हाण, देव नि मालोजीराव निंबाळकर एका सभेला जात होते. त्यावेळीं रस्त्यावरच्या पोरांनीं

फलटणच्या पोरा
सासवडच्या चोरा
नाशिकच्या फितुरा
साताराच्या मुजोरा
बांगड्या भरा अहो, बांगड्या भरा!

असा गजर करून त्यांच्या अंगावर अक्षरशः बांगड्या फेकल्या. मामा देवगिरीकरावरचें

त्रिंबकमामा, त्रिंबकमामा
खाइ थालिपीठ आणि फुटाणा
कुंथत कुंथत जाई विमाना
दिल्लींत जाऊन पडे उताणा

हें गाणें किंवा सदोबा पाटलावरची

घनश्याम वंदरा सदोबा, अरुणोदय झाला
उठिं लौकरि बा, प्राशन करि हा चल 'कोकाकोला'

ही भूपाळी किंवा संयुक्त महाराष्ट्राशीं द्रोह करणाऱ्या विदर्भाच्या पुढाऱ्यावरचे

अन्नमवार, कन्नमवार
महाराष्ट्राचा घातवार
इकडे हा तुमपल्लिवार
तिकडे कोणी जहन्नम्वार !

हें गाणें त्यावेळीं लोकांना फार आवडलें होतें. पण सर्वांत लोकप्रियतेचा उच्चांक

पांडोबा पांडोबा भागलास का ?
शेटजीच्या ढगल्याखालीं लपलास का ?

आणि

वाहवा, वाहवा, नेहरू हा
सुंदर कितितरि खचित अहा !

ह्या गाण्यांनीं पटकावला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचें लोण त्यांनीं महाराष्ट्रांतल्या बाळगोपाळापर्यंत नेऊन पोहोचविलें. संयुक्त महाराष्ट्राचा इतिहास जेव्हां लिहिला जाईल, तेव्हां ह्या संग्रहांतील कित्येक गाण्यांनीं लोकजागृतीचें जें प्रभावी कार्य केलें, त्याचा त्यांत अवश्यमेव उल्लेख करावा लागेल. राजकीय आंदोलनाच्या भट्टीमधून तावून सुलाखून निघालेलीं हीं गाणीं वाङ्मयीन कसोटीला उतरतील असें सांगण्याचीहि आवश्यकता नाहीं. ह्या संग्रहांतल्या विडंबन-काव्यांचा मोठा वांटा अद्भुत विनोदी प्रतिभेचे विख्यात लेखक दत्तु बांदेकर ह्यांनीं उचललेला आहे, म्हणून त्यांचें जेवढें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे.

हें पंचगव्य प्राशन करतांना द्विभाषिकवादी काँग्रेसवाल्यांना फार यातना होतील हें मला मान्य आहे. पण त्याला कांहीं इलाज नाहीं. पण द्विभाषिक राज्य नष्ट होईपर्यंत ह्या 'पंचगव्या'चें प्राशन थोडें थोडें कां होईना पण प्रत्येक संयुक्त महाराष्ट्रवाद्यानें सकाळीं उठून सहकुटुंब सपरिवार नियमानें केलें, तर 'संयुक्त महाराष्ट्र'प्राप्तीच्या रूपांत त्याचें फळ त्याला प्राप्त झाल्यावांचून राहणार नाहीं असें मी निश्चयानें सांगतो.

**प्रल्हाद केशव अत्रे**

१२ ऑगस्ट १९५८

# आचार्य अत्रे यांचें साहित्य

**नाटकें**

साष्टांग नमस्कार
घराबाहेर
अुद्यांचा संसार
लग्नाची बेडी
भ्रमाचा भोपळा
पराचा कावळा
मी अुभा आहें
वंदे भारतम्
जग काय म्हणेल ?
पाणिग्रहण
कवडीचुंबक
अेकच प्याला
गुरुदक्षणा
वीरवचन

**आगामी**

मोरूची मावशी
ब्रह्मचारी

**कथा**

बत्ताशी
कशी आहे गम्मत
ब्रँडीची बाटली
मूर्खांचा बाजार
निशिगंध
साखरपुडा
वामकुक्षी
हास्यकथा—१–२

**काव्य**

झेंडूचीं फुलें
गीतगंगा
पंचगव्य

**अितर**

मी कसा झालों ?
सिंहगर्जना
चित्रकथा
पत्रकार अत्रे
हंशा आणि टाळ्या
महात्मा फुले
मराठी माणसें, मराठी मनें
समाधीवरील अश्रू
साहित्ययात्रा
श्रमंति
मुद्दे आणि गुद्दे
पंचामृत
चांगुणा
मोहित्यांचा शाप
अत्रे अुवाच
ललित वाङ्मय
स्वराज्याचा अरुणोदय
वसंतसेना

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23623 दि: ...
क्रमांक ... नों: दि: 3-1-55

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| वंदन | १३ |
| हातांत घ्या काळें निशाण | १४ |
| संयुक्त महाराष्ट्राची 'गंमत जंमत' | १६ |
| वाहवा, वाहवा, नेहरू हा ! | २१ |
| त्रिंबकमामा | २३ |
| कॉंग्रेसचा फटका | २४ |
| देशिल का मज व्होट ? | २७ |
| कुणि नाहीं ग | २८ |
| अजि म्यां 'काका' पाहिला ! | २९ |
| निवडणुकींतलीं कीर्तनें | ३१ |
| आरती गणपतीची | ३३ |
| कॉंग्रेसची बैलजोडी | ३५ |
| शिमग्याच्या बोंबा | ३६ |
| सदोबाकृत मुंबईची प्रार्थना | ३८ |
| सदोबा-गौरव-गीत | ३९ |
| भाषावार प्रांतरचनेचें शांतिगीत | ४० |
| पारण्याचें गाणें | ४१ |
| संयुक्त महाराष्ट्राचीं शिशुगीतें | ४३ |
| चव्हाणांना पुणेकरांचा निरोप | ४५ |
| कॉंग्रेसला चला | ४७ |
| आरती भाऊसाहेब हिऱ्यांची | ४८ |

| | |
|---|---|
| आरती मंगलमूर्तीची | ५० |
| अजि म्यां 'काका' पाहिला | ५२ |
| सुंदर तें ध्यान | ५४ |
| घनश्याम बंदरा सदोबा | ५६ |
| शंभर उंदिर खाउनि बोका | ५८ |
| किती किती सांगू तुला ग! | ६० |
| मोरया तुझें, नांव चांगलें | ६२ |
| करराक्षस ! | ६३ |
| म्हातारा इतुका न— | ६५ |
| जाऊं गडावरतीं | ६६ |
| रणरागिणी अहिल्या | ६७ |
| उपवासी 'देव' माझा | ६८ |
| अन्नम्वार! कन्नम्वार ! | ७० |
| शमीवरचीं शस्त्रें | ७२ |
| अहमदाबाद ! अहमदाबाद ! | ७४ |
| सारनाथचे चार सिंह | ७६ |
| दिली फेकुनी खादी टोपी | ७८ |
| आलखण पालखण | ८० |
| स्वागत बोरकरदादा | ८१ |
| आरती गणपतीची | ८२ |
| द्विभाषिक राज्याचीं गाणीं | ८४ |
| हे कोण बोलले बोला | ८५ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 23523 वि: 03144
क्रमांक 9411 नों: दि: 30175

# वंदन

नमस्ते श्री महाराष्ट्रा, स्वातंत्र्याच्या जवाहरा
तीन कोटी मराठ्यांच्या पितृदेवा परात्परा !

संतांच्या वंद्य माहेरा, वीरांच्या बलसागरा,
तुला निर्मून ही झाली धन्य वाटे वसुंधरा !

महाराष्ट्रा, तुझ्या पायीं असो साष्टांग वंदन
तुझ्यासाठीं झिजो माझ्या देहाचें नित्य चंदन !

तुझे गोटे, तुझे काटे फुलांची शेज ही मला !
कणीकोंडा तुझा आहे गोड मांड्याहुनी भला

महाराष्ट्रा, तुझ्यापायीं घालूं लोटांगणें किती ?
तुझीं गाणीं, तुझीं स्तोत्रें भक्तीनें गाऊं मी किती ?

१५ एप्रिल १९५५ —आचार्य अत्रे

मराठी ग्रंथ संग्रहालय
90083

# हातांत घ्या काळें निशाण

आतां मराठ्यांनों, उठा
हातांत घ्या काळें निशाण !
ते दोन मंत्री बेइमान
आले हिरे ! आले चव्हाण ! १

मंत्रीपदास्तव टाकिलें
ह्यांनीं महाराष्ट्रा गहाण !
कापून मुंबईचा गळा
ह्यांनींच केली धूळधाण २

मुंबापुरींत मुरार्जीनें
'शिर्काण' केलें तें भयाण !
सामील झाले त्याज हे
मंत्री मराठी बेइमान ! ३

मालोजिच्या वाड्यांतुनी
तो गर्जला येसा चव्हाण—
"थू त्या महाराष्ट्रावरी
मज नेहरू देवासमान !" ४

बोले हिरे "मीं दिलें
काँग्रेसला माझें इमान !

कॉंग्रेसश्रेष्ठींच्या पुढें
मी आपली कापीन मान !" ५

कॉंग्रेसला ह्याच्यापुढें
नाहीं महाराष्ट्रांत स्थान !
आली पुन्हा मत मागण्या
पायांतली दावा वहाण ! ६

मोरार्जिच्या पायांतले
हे दोन मंत्री पायताण !
मंत्रीपदास्तव जाहले
हे नेहरूंचे दोन श्वान ! ७

आतां मराठ्यांनों, उठा,
आहे तुम्हां ना स्वाभिमान ?
जेथें हिरे, जेथें चव्हाण
तेथें आतां काळें निशाण ! ८

—आचार्य अत्रे

२५ मार्च १९५६

# संयुक्त महाराष्ट्राची ‘ गंमत-जंमत ’

१

असा कसा ‘देवाचा देव’ बाई ठकडा ।
‘देव’ एका पंचानें उघडा ॥

दिल्लीला जातो
वाटाघाटी करितो
महाराष्ट्राचा केला यानें रबडा ॥

उपास करितो
धमकीच देतो
म्हणे नको सत्याग्रह झगडा ॥

गांधीचा चेला ।
म्हणतो स्वतःला
एक नंबरचा भोंदू तगडा ॥

२

अडगुळं मडगुळं
काकाचं कडबोळं
दिल्लीला जाऊं
लाथा खाऊं
गरगर चंदा

अकलेचा कांदा
मामा मिंधा
अर्धी मुलाखत
सगळाच वांधा

३

एक जोडा झेलं बाई,
दोन जोडे झेलं
दोन जोडे झेलं बाई,
तीन जोडे झेलं
तीन जोडे झेलं बाई,
चार जोडे झेलं

चार जोडयांचा चपलाहार
पाहुणा झाला गारीगार
मोटारींतून होई पसार

४

फलटणच्या वाटे—कुचकुच काटे
कोण पाहुणा आला ग बाई
मंत्री पाहुणा आला ग बाई
मंत्र्यानें काय आणलं ग बाई
बलसाडचा आंबा आणला ग बाई
मंत्र्याचें तोंड मी पाहत नाहीं

चारी दरवाजे लावा ग बाई
झिपरं कुत्रं सोडा ग बाई

५

गण्या गण्या गणपती
पगार भत्ता खातो किती ?
हंडा हंडा कढी, डेरा डेरा भात
आमचा गण्या जेवतो, जेवून विडा खातो
गांवांत दौरे काढतो, काळें निशाण पाहतो
मोटारींतुन पळ काढतो

६

अक्कण माती चिक्कण माती
अश्शी माती सुरेख बाई
दगड बसवावा
अस्सा दगड सुरेख बाई,
शेंदुर फासावा
अस्सा शेंदुर सुरेख बाई
पुढारी करावा
अस्सा पुढारी सुरेख बाई
काँग्रेसला वहावा
अश्शी काँग्रेसला सुरेख बाई
काळा बाजार करावा

अस्सा बाजार सुरेख बाई
मोटारी उडवाव्या
अश्शी मोटार सुरेख बाई
सदोबा पूजावा
अस्सा सदोबा सुरेख बाई
दिल्लीला धाडावा
अश्शी दिल्ली सुरेख बाई
चोरांना राखीते
अश्शी मुंबई द्वाड बाई
चोरांना हाकीते

७

बांगड्या भरा, अहो बांगड्या भरा
कॉंग्रेसच्या नरा, बांगडया भरा

फलटणच्या पोरा
सासवडच्या चोरा
नाशिकच्या फितुरा
साताराच्या मुजोरा
बांगडया भरा अहो बांगडया भरा

कुंकू घ्या, खण घ्या
चोळी घ्या, साडी घ्या
वेणी घ्या, फणी घ्या

मंगलसूत्र-मणी घ्या
लाजत लाजत घ्या
'तिकड'चें नांव जरा
बांगड्या भरा, अहो बांगड्या भरा

६ मे १९५६ —दत्तु बांदेकर

## वाहवा, वाहवा, नेहरू हा !

वाहवा, वाहवा, नेहरू हा
सुंदर कितितरि खचित अहा
तर तो आपण पाहूं या
त्याला जाउनि सांगूं या
नेहरू काका,
मुंबई टाका
आई आहे ही असुची
नाहिं कुणाच्या बापाची ! १

अरे बापरे, पळा पळा
नेहरूकाका रागवला
बंदुकवाले पोलिस हा
घेउनि आला पहा पहा !
म्हणतो मुंबई
देतच नाहीं
मान हलविली जोरांत
टोपी पडली चिखलांत ! २

नेहरूकाका घाबरला, घाबरला,
दडून मोटारिंत बसला
इतुका कां हो रागवतो ?
लाल टमाटो हा दिसतो !

ग्रंथ संग्रहालय ठाणे
१००८३

नको रे बाबा
चिडका बिब्बा
नेहरूकाका हा हट्टी
ह्याची अमुची फू गट्टी !

१७ जून १९५६ —आचार्य अत्रे

# त्रिंबकमामा

त्रिंबकमामा त्रिंबकमामा
खाइ थालिपिठ आणि फुटाणा
कुंथत कुंथत जाई विमाना
दिल्लिंत जाउन पडे उताणा

पुण्यांत येउन करी ठणाणा
संगें घेऊन हिरे-चव्हाणा
हरामखोरी करितो नाना
खाई चप्पल आणि वहाणा
परी न होई कधीं शहाणा

कॉंग्रेसचा बैलोबा जाणा
गुलामापरी ओढी घाणा
नाहीं तिळभर मराठी बाणा
देशभक्तिचा करी बहाणा
त्रिंबकमामा त्रिंबकमामा

८ जुलै १९५६ —दत्तु बांदेकर

# काँग्रेसचा फटका

भल्या माणसा निवडणुकीची
गोष्ट सांगतों विसरुं नको
तिकिटासाठीं काँग्रेसदारीं—
भीक मागण्या लाजूं नको

नसे पात्रता अंगीं जरिही
त्यासाठीं तूं अडूं नको
मस्का लावुनि वशिला मारुनि
स्वार्थ साधण्या चुकूं नको

सभेंत मंत्री बोलत असतां
जोडे त्याला देउं नको
मंत्र्यापुढती हांजी हांजी
करावयाला लाजुं नको

एक बायको जिवंत असतां
लगीन दुसरें करूं नको
व्हिस्कीच्या नादास लागुनी
हातभट्टिला विसरुं नको

स्वाभिमान तूं धरूं नको
महाराष्ट्राला मानुं नको
छत्रपतींचें स्मरण नको

'महाराष्ट्राहुन नेहरू मोठा'
बकवा करण्या चुकूं नको

पोलिसफौजा घेतल्याविना
दौरा कधिंही काढुं नको

सत्य-अहिंसा मुखीं परंतु
बंदुक आपुली सोडुं नको

खादी डगला सफेत टोपी
श्रीमंतीचा डौल नको

चटईवर झोपणें बरें तें
गादीवरतीं लोळुं नको

आत्मशुद्धिचें नांव घेउनी
उपास करण्या चुकूं नको

उपासकाळिं गड्या चोरुनी
चिवडा खाण्या विसरुं नको

आंघोळीला हवा कशाला
साबण अंगा लावुं नको

राखुंडी ती बरी गावठी
विलायती टूथपेस्ट नको

जनतेचें हित पाहुं नको
वचन आपुलें पाळुं नको
लोकशाहिची चाड नको

भाटगिरी कॉंग्रेसश्रेष्ठिंची
करावयाला लाजुं नको

६ जानेवारी १९५७ —दत्तु बांदेकर

## देशिल का मज व्होट ?

देशिल का मज व्होट--सुंदरी
देशिल का मज व्होट ?

देशिल तूं जर व्होट तुला मी
देइन हिरवी नोट !

प्राजक्ताच्या देठापरि तव
नाजुक सुंदर ओठ ?

तुझ्या मताचा पाज सुंदरी
एकच मजला घोट

माझ्या अंगावरी पांढरा
खादीचा हा कोट

तुझ्या चोळिचा डौल निराळा
अर्धे उघडें पोट

देशिल का मज व्होट—सुंदरी,
देशिल का मज व्होट

—दत्तु बांदेकर

२४ फेब्रुवारी १९५७

## कुणि नाहीं ग

कुणि नाहीं ग कुणि नाहीं
आम्हांला पाहत बाई

तोंडावर घेऊं बुरखा
बुरख्यांतच मारूं मुरका

चाळींचाळींतून फिरूं
मतदारांचे पाय धरूं

चोरपावलांनीं जाऊं
दारावर टिचकी देऊं

चिडतिल त्या बायका जरी
प्रचार करूं या घरोघरीं

कुत्रीं येती
अंगावरतीं
पोरें हसती

बसे लाटणें डोक्यांत
तरी नको त्याची खंत !

२४ फेब्रुवारी १९५७ —दत्तु बांदेकर

# अजि म्यां 'काका' पाहिला !

*('अजि म्यां सिंह पाहिला !' ही ना. काकासाहेब गाडगीळ ह्यांनीं रचलेली काव्यपंक्ति वाचून आमच्या तोंडून पुढील काव्य बाहेर पडलें !)*

अजि म्यां 'काका' पाहिला !

खांदां कांबळ, शिरिं मुंडासें,
बैलाच्या गाडींत बैसला ! १

निवडणुकीचा कुजका नारळ
घेउनि आला घोडनदीला २

तिखटमिठाच्या देइ करंज्या
म्हणतो साखर हवी कशाला ? ३

सांगे 'धरणें' पुरीं होऊं द्या
मग निर्मा तुम्हि कोटि प्रजेला ! ४

पकडुनि 'काळा व्यापारी' द्या
मग मी मारिन म्हणतों त्याला ! ५

म्हणे धन्य तो वल्लभभाई
रफ्फु करी जो शालजोडिला !     ६

मतदारांना सदैव पाजी
थापांचा जो 'काका-कोला' !     ७

१५ जुलै १९५१

—आचार्य अत्रे

# निवडणुकींतलीं कीर्तनें

## अभंग

आम्ही काँग्रेसचीं बाळें
करूं देशाचें वाटोळें

आत्मबळ आम्हांपाशीं
मारूं लोकांना उपाशी

आम्ही नीतीचे पुतळे
करूं गडबड घोटाळे

सालो म्हणे चक्रपाणी
आमची विपरीत करणी

सुंदर तें ध्यान व्यासपीठावरी
खादीवेषधारी, देशभक्त

मुखामध्यें हरी बगलेंत सुरी
थापा नित्य मारी, गोड गोड

जगाच्या कल्याणा शरीर झिजवी
दगड बसवी, रोज रोज

सालो म्हणे आम्ही रामराज्यवाले
धान्य पिकविलें, कुंडीमध्यें.

गिरणीवाले येती घरा
तोचि दिवाळी दसरा

काळ्या बाजाराचें धन
तोचि आमचा नारायण

३० डिसेंबर १९५१ —दत्तु बांदेकर

## आरती गणपतीची

सुखकर्ता दुखहर्ता वार्ता दिल्लीची
नेहरू आणि टंडन यांच्या कुस्तीची
अमेरिकेहून आली बोट धान्याची
खाउन मस्ती आली कीं भांडायाची
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ति
काँग्रेसमध्यें राजिनाम्यांची भरती ॥ १ ॥

सत्य-अहिंसेचा तोंडांत पाठ
रामराज्यामध्यें चोर मोकाट
सांभाळा देवा खिसापाकीट
पोलिस बंदोबस्त आहे अचाट
जयदेव जयदेव जय मंगमूर्ति ।
काळ्या बाजाराला नेई तूं वरतीं ॥ २ ॥

संतांमध्यें संत बाळाजीपंत
पायाच्या दगडांनीं झाले प्रख्यात
मोरारजी त्यांचा गुरुजी महंत
दोघेहि पाहती जनतेचा अंत
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ति ।
देशावरतीं राज्य नालायक करती ॥ ३ ॥

'अन्नपूर्णा' मधुनी आठ आठ आण्याची
प्लेट आणली देवा, घ्या नैवेद्याची

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २३६२३ कि. ३८४

काँग्रेसची निशाणी दोन बैलांची
बैठक ज्यावर आहे तुमच्या बापाची
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ति
चला देवा, आतां चौपाटीवरती ॥ ४ ॥

९ सप्टेंबर १९५२ —दत्तु बांदेकर

# काँग्रेसची बैलजोडी

काँग्रेसची बैलजोडी
मेजवानी सदा झोडी

जनतेचें अन्न तोडी
गोरगरीबांना, रोज नाडी

श्रीमंतांना देई, मोटारगाडी
कामगारांना गोळ्या झाडी

संयुक्त महाराष्ट्राला लावी काडी
लोकशाहीला खालीं पाडी

काळ्या बाजाराला मोकाट सोडी
हातभट्टीचें पुण्य जोडी

काँग्रेसच्या बैलांची लबाडी
भारताची करी नासाडी

१३ जानेवारी १९५२

—दत्तु बांदेकर

# शिमग्याच्या बोंबा

पहिली माझी बोंब, ठणाणा ठणाणा
आठवूं मंत्र्यांना, कार्यारंभीं.

दुसरी माझी बोंब, बलसाडाचा राणा,
घालितो धिंगाणा, राज्यामध्यें

तिसरी माझी बोंब, धाव रे सदोबा
धुळवडीला शोभा, तुझ्यामुळें.

पांचवी माझी बोंब, रामराज्य थोर,
भोकाची विहीर, जावयाला

सहावी माझी बोंब, काका गाडगीळ
महाराष्ट्राचा काळ, घातपाती

सातवी माझी बोंब, नवा विक्रीकर,
व्यापाऱ्यांचा सूर, शिमग्यांत

आठवी माझी बोंब, भाषावार प्रांत
मारा उलटा हात, तोंडावर

नववी माझी बोंब, नारोपंत फडके
हातामध्यें मडकें, चिखलाचें

दहावी माझी बोंब, शिमग्याचें सोंग,
फाटकांचा रंग, लाल चीन

अकरावी माझी बोंब, भांडवली भोंगा
पांडोबाचा शिमगा, लोकमान्य

बारावी माझी बोंब, दुष्काळांत होती,
पुरणाची पोळी, मंत्री खाती.

१ मार्च १९५३ —दत्तु बांदेकर

# सदोबाकृत मुंबईची प्रार्थना

थोर तुझे उपकार आई,
थोर तुझे उपकार ॥ ध्रु० ॥

तुझ्या कृपेनें लाभे मजला
नवीन मोटर कार ।

देशभक्तिचा धंदा केला
झाली कीर्ती फार ॥

सदैव माझ्या असे भोंवतीं
धनिकांचा बाजार ।

लठ्ठ होउनी तट्ट जाहला,
देहाचा आकार ॥

निवडणुकीचा मोसम येतां
गळ्यांत पडती हार ।

'कोका कोला' प्राशुनि झाला
आत्मा माझा गार ॥

थोर तुझे उपकार आई,
थोर तुझे उपकार ॥

२ ऑगस्ट १९५३

—दत्तु बांदेकर

# सदोबा-गौरव-गीत

*(आंध्र निवडणुकांत कम्युनिस्टांचा पराभव व्हावा म्हणून सदोबांनीं जो महान् पराक्रम गाजवला त्याबद्दल त्यांचा सत्कार ह्या कवितेंत केला आहे.)*

तूं अमुचा सरदार—सदोबा
तूं अमुचा सरदार ॥ ध्रु० ॥

मुंबापुरिच्या श्रीमंतांना
तूंच एक आधार ।

देशासाठीं रात्रंदिन जो
मोटारीवर स्वार ।

उन्हाळ्यामधिं देशी सकलां
'कोका-कोला' गार ।

कम्युनिस्टांचें कंदन केलें
थोर तुझे उपकार ।

विजयानंदें अर्पण करतो
तुला फुलांचे हार ।

१० मे १९५५

—दत्तु बांदेकर

# भाषावार प्रांतरचनचें शांतिगीत

सुजनहो, शांतीला तुम्ही वरा ।
सोडूं नका तिज घट्ट धरा ।। ध्रु ।।

भाषिक राज्यें होतिल आतां
रिपोर्ट त्याचा छापुनि येतां
भांडुं नका तुम्ही जरा
सुजनहो, शांतीला तुम्ही वरा ।। १ ।।

जरी तापलें डोकें तुमचें
थंडगार तेलानें त्याचें
मालिश तुम्ही करा ।
सुजनहो, शांतीला तुम्ही वरा ।। २ ।।

आपण सारे भाई भाई
बदामपिस्ते एके ठायीं
प्रेमभाव हा बरा ।
सुजनहो, शांतीला तुम्ही वरा ।। ३ ।।

२५ सप्टेंबर १९५५ —दत्तु बांदेकर

## पारण्याचें गाणें

घोट घ्यावा शंकरराव
गांधीजींच्या नंदीदेवा                ॥ ध्रु० ॥

अकरा दिवस उपोषण
थकलां कीं हो तुम्ही करून
दिसे तोंड कळाहीन
   जसा कांहीं 'सुका मेवा'!   ॥ १ ॥

हिंसा मुंबईंत झाली
होई मांगल्याची होळी
मानव्यानें बोंब केली
   "धावा शंकरदेवा, धावा!"   ॥ २ ॥

तुम्हां झालें दुःख फार
म्हणाला कीं ह्याचा भार
आहे माझ्या शिरावर,
   उपासाचा केला कावा!   ॥ ३ ॥

मुंबईचे लोक दुष्ट
किती बोलले वाईट
"जा जा बुडा समुद्रांत—
   उपासानें मरा किंवा!"   ॥ ४ ॥

केल्या महाराष्ट्रासाठीं
किती ह्यांनीं आटापिटी
परी नाहीं कोणा 'पिटी' (pity)
शिरजोर पक्ष डावा! ॥ ५ ॥

कोणी निंदा कोणी वंदा,
उपोषण ह्यांचा धंदा
आहे गांधीशिष्य बंदा
सदा संकटीं स्मरावा! ॥ ६ ॥

घेत्रोनिया प्रायश्चित्त,
तुम्हीं शुद्ध केलें चित्त,
घ्या हो मोसंब्याचा घोट
आज दिवस बारावा! ॥ ७ ॥

चला लौकर घ्या हो घोट
नका उपटुं दाढी-खुंट,
उद्यां 'टाइम्स' पत्रांत
फोटो एवढा हा द्यावा! ॥ ८ ॥

२६ फेब्रुवारी १९५६ —आचार्य अत्रे

१

पांडोबा पांडोबा भागलास का ?
शेटजीच्या डगल्याखालीं लपलास कां ?
शेटजीचा डगला गुजराती
मंत्र्याचा वाडा चिकणमाती !
मंत्र्याचा वाडा पाहुन जा
तूपरोटी खाऊन जा;
तुपांत पडला 'मामा'
पांडोबा देई राजिनामा
पण—
दुसऱ्या दिवशीं जाई कामा

२

येरे येरे पुढाऱ्या
तुला देतों गंडेऱ्या
पुढारी झाला खोटा
विरोध झाला मोठा
काळे झेंडे झिम् झिम्
पुढारी झाला घामाघुम
चप्पल पडती मुसळधार
पोलिस करिती लाठीमार

३

नाच रे मोऱ्या, मुंबईच्या रस्त्यांत
नाच रे मोऱ्या नाच!
हक्कासाठीं मराठा झुंजला रे
सत्याग्रही मोर्चा आला रे
चालव तुझी गोळी, ढेबर देई टाळी
महाराष्ट्रवैऱ्या, नाच!

४

आंबा पिकतो
रस गळतो
फलटणचा राजा झिम्मा खेळतो!

झिम बाई झिम
मंत्र्यांचा झिम
झिम गेला फुटुन
मंत्रि आले उठुन
सर सर मालोजी येतो
'यशवंता'ला खुणवीतो
ये यशवंता नाचूं या
महाराष्ट्राला गाडूं या

२९ एप्रिल १९५६ —दत्तु बांदेकर

# चव्हाणांना पुणेकरांचा निरोप

*(पुण्याच्या शिवाजी आखाडयामधून मोटारींत बसून पळून जातांना ना. यशवंतराव चव्हाणांना पुण्याच्या जनतेनें असाच निरोप दिला असेल काय?)*

मंत्र्या, येशिल कधिं परतून?
आज दिलेल्या 'आहेरा'ची ओळख नीट धरून ॥ध्रु०॥

कितीक गेले भजीं पुण्यांतुनि आजवरी खाऊन,
परि चपलांची तूंच एकटा जाशि माळ घालून! १

निदर्शकांच्या आरोळ्यांनीं घाबरगुंडि उडून
अर्धें भाषण करूनी जाशिल पुन्हा असाच पळून! २

'काळिं निशाणें' तशिच राहतिल व्यर्थ घरांत पडून,
आश्रयदाता आहे त्यांचा कोण तुझ्यावांचून? ३

भाषण ऐकायाला श्रोता नाहिं सभेंत चुकून,
उभे लोक बाहेर 'स्वागता' अनवाणी होऊन! ४

लाठीवाले पोलिस संगें ये अपुल्या घेऊन,
काळा बुरखा आणि हवा तर तोंडावर ओढून! ५

सत्काराची अशीच संधी दे रे अधुनमधून,
म्हणजे तुटक्या पायतणांना येइल भाव फिरून! ६

जर का येशिल गणू तपासे–मालोजिस घेऊन,
येइल सारें पुणें तिघांच्या 'सत्कारा' धावून! ७

मार खाउनी जो जो पळतो पुण्यपत्तनांतून
तो 'इतिहासीं' अमर होतसे; विसरूं नको ही खूण! ८

२९ एप्रिल १९५६ —आचार्य अत्रे

# काँग्रेसला चला

काँग्रेसला चला, अहो काँग्रेसला चला
तीन लाखाचा मंडप, त्याला बलसाडचे बांबू
सदोबांनीं उभारला, सर्कशीचा तंबू
काँग्रेसला चला, अहो काँग्रेसला चला

ढोल वाजवा, बँड वाजवा,
ढेबरदेव आले
काळ्या काळ्या झेंडयांनीं स्वागत त्यांचें झालें
पुढाऱ्यांच्या स्वागताला, गर्दी पहा लोटली
घराघरांवर काळीं निशाणें मुंबापुरी नटली

काँग्रेसच्या वाटेवर, सत्याग्रहींची दाटी
पोलिसांच्या हातांत, अहिंसात्मक लाठी
पाऊसवारा आला मोठा, छप्पर गेलें उडून
काँग्रेसचा ठराव पाण्यांत गेला बुडून

अल्याड नेहरू, पल्याड ढेबर, मध्यें बसला 'मोऱ्या'
मुंबईंत काँग्रेसच्या बैठकीचा वाजला बोऱ्या
काँग्रेसला चला, अहो काँग्रेसला चला

—दत्तु बांदेकर

३ जून १९५६

# आरती भाऊसाहेब हिऱ्यांची !

*('आवश्यकता पडेल तर' मंत्रिपदाचा राजिनामा देऊं ही भीषण घोषणा करण्याचें अलौकिक धैर्य दाखविल्याबद्दल सारे महाराष्ट्रवीर भाऊसाहेब हिऱ्यांना अशीच आरती ओवाळीत असतील काय ?)*

(चाल : आरती ज्ञानराया)

आरती हिरेभाऊ
नका राजिनामा देऊं ! ।। ध्रु० ।।

महामूर्ख लोक वेडे,
मारतात तुम्हां जोडे,
दाखवितात काळे झेंडे
नका लक्ष तिकडे देऊं ! १

देह जावो अथवा राहो,
मंत्रिपदीं तुमचा भावो
कोणी फोडो किती टाहो
म्हणो तुम्हां जोडेखाऊं ! २

कसा येश्वंता चव्हाण
घट्ट जागेला चिकटून
बैसे जसा कीं ढेकूण
गादीमध्यें मऊ मऊ ! ३

पुसा नेहरूंचे बूट
झेला मोरारजींची लाथ
चाटा ढेबराचे हात
तेच तुमचे बापभाऊ ! ४

जळे ना का महाराष्ट्र
त्याचे तीन कोटी पुत्र,
तुम्ही म्हणा एक मंत्र
मरूं—पण मंत्री राहूं ! ५

२४ जून १९५६.

—आचार्य अत्रे

## आरती मंगलमूर्तींची

सुखकर्ता दुखहर्ता वार्ता गोव्याची ।
नाकेबंदी झाली सत्याग्रहाची ॥
मार्गामध्यें धोंड रडव्या कॉंग्रेसची ।
शेंदाडांना भीति रणमैदानाची ॥
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ति ।
तूंचि देवा कर गोव्याची मुक्ति ॥ १ ॥

भाषावार राज्यरचनेचा घोडा ।
घोडयाच्या पायांत मुंबईचा खोडा ॥
महाराष्ट्राला द्यावा न्यायनिवाडा ।
भांडवलशाहीचा डाव हाणून पाडा ॥
जयदेव जयदेव जग मंगलमूर्ति ।
विश्वशांतीसाठीं मंत्री तळमळती ॥ २ ॥

समाजवादी ढंग देशांत आला ।
पांढऱ्या टोपीचा जहाल चाळा ।
कसेल त्याची जमीन मालक तो मेला ।
हप्ते भरतां भरतां कूळ नागवला ॥
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ति ।
बेकारांची रामराज्यांत भरती, ॥ ३ ॥

विद्यासुख दाता तूं गौरीनंदना ।
शिक्षणखात्यामध्यें विद्येची दैना ॥

मंत्री संत्री करिती प्रयोग नाना।
शाळा विद्यापीठें करिती ठणाणा।
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ति।
काँग्रेसच्या मंत्र्यांना देई तूं स्फूर्ति ॥४॥

लाडू मोदक चकली कडबोळीं छान।
नैवेद्याला केलें पंचपक्वान्न
सरकारी दुधाचें पंचामृतपान।
आरे गौळीवाडा झाला प्रसन्न ॥
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ति
भेटूं देवा आतां चौपाटीवरती ॥५॥

१८ सप्टेंबर १९५५

—दत्तु बांदेकर

दा. क्र. 90083

# अजि म्यां काका पाहिला

*(श्री. काकासाहेब गाडगीळ हे परवां इंदूरला जात असतां, सवाई माधवपूर स्टेशनवर एका माकडानें त्यांच्या डब्यांत उडी मारली व चष्म्याची पेटी घेऊन तें पळालें!)*

अजि म्यां काका पाहिला ॥ ध्रु० ॥

आगगाडिच्या डब्यांत शिरुनी,
मीं हो पाहिला।
ध्यान मनोहर, तेज मुखावर,
टक्कल डोइला।
वेष पांढरा, खादी सदरा,
सोटा बाजुला।

थापा मारित, मित्रासंगें,
होता रंगला।
हळू हळू, मग डब्यांत त्याचा,
डोळा लागला।
साधुनि संधी, अवचित मग मीं,
डाका घातला।
सोनेरी, चकचकीत त्यांचा,
चष्मा चोरिला।

‘धावा धावा’, ‘पकडा पकडा’
काका गर्जला ।
मींहि वाकुल्या, दावुनि त्याला,
भारी चिडविला ।
म्हटलें त्यांना ‘खुशाल आतां,
काका कोकला’ ।
चरफडला, रडला, गडबडला,
फिरुनी झोपला ।
‘वीर मारुती’ काका माझा,
मीं हो वंदिला ।
अजि म्यां काका पाहिला ॥

१९ जुलै १९५३

—दत्तु बांदेकर

## सुंदर तें ध्यान

सुंदर तें ध्यान। दिसे नेहरूचें
शिरीं सदोबांचें। शिरस्त्राण ! १

वरी मोरारजी। धरीतसे छत्री,
भोंवतालीं कुत्रीं। खादीवालीं २

अध्यक्ष ढेबर। चालला मागून,
चालीं चापलीन। कॉंग्रेसचा ३

सभोंवार खडया। पोलिसांच्या फौजा,
जवाहर राजा। मध्यें चाले ४

पाही जेव्हां काळे। झेंडे घरोघर
ऐके अन् गजर। महाराष्ट्राचा! ५

पेटे डोळ्यांमध्यें। क्रोधाचा अंगार
कांपे थरथर। संतापानें ६

म्हणे "निवडणुका। जाऊं द्या खड्डयांत
मरूं द्या भारत। खुशाल तो ! ७

नाहीं मी देणार। मुंबई महाराष्ट्रा,
मारा बोंबा आतां। पांच वर्षे !" ८

हासले ढेबर। मोरारजी, स. का.
पोलीस बंदुका। सरसाविती! ९

'तुका' म्हणे आतां । शिवरायावीण
रक्षील कवण । महाराष्ट्राला ! १०

१० जून १९५६ —आचार्य अत्रे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 234223 दि: 3.1.64
क्रमांक 9822 नों: दि: 3-1-64

# घनश्याम बंदरा सदोबा

घनश्याम बंदरा सदोबा, अरुणोदय झाला,
उठिं लौकरि बा, प्राशन करि हा चल 'कोका कोला!' ॥ ध्रु० ॥

सोडाव्हॉटर बॉटल घेउनि हातीं हा आला,
केशव बोरकर तुझा लाडका तुझ्या दर्शनाला ? १

पैशाच्या हा थैल्या घेउनि बाबू चीनॉय,
हात जोडुनी उभा जसा कीं चपराशी बॉय ! २

पारिख नाथालाल हिऱ्यांची घेउनि ये पेटी
परदेशीच्या दौऱ्यावर ये तुज नेण्यासाठीं ! ३

विजार लांडी, हातीं कंकण, शिरीं निळा फेटा,
चला उठा त्या प्रतापसिंगा कडकडुनी भेटा ! ४

थुंकि झेलण्या, जोडे पुसण्या आणि इतर कामा
मिशाळ शर्मा येइ, तसा तो हर्डीकर रामा ! ५

भेटायाला तसा तुला बघ उत्सुक हा झाला,
मुंबईंतल्या हात भट्टिंच्या दादांचा मेळा ! ६

ह्या सर्वांच्या आधारावर केल्या तूं मौजा,
जाहलास अन् मुंबापुरिचा 'अनभिषिक्त' राजा ! ७

फंड जमविला देशासाठीं तुवां तीन कोटी,
कुणा न कळलें, कमाविलें किति कमिशन त्यापोटीं ! ८

दुष्ट मराठी दैत्यापासुन हे वल्लभबाळा
गुजरात्यांचें रक्षण करण्या तूं ना अवतरला ? ९

गुर्जर जनता पूजितसे तुज भक्तीनें आजी
हृदयमंदिरांतला तयांच्या तूं श्री बालाजी ! १०

ऊठ नेहरूनंदिकेश्वरा, उशीर बहु झाला,
—आणि तशांतुन मुरारजीचा फोनहि बघ आला ! ११

—आचार्य अत्रे

१५ जुलै १९५६

# शंभर उंदिर खाउनि बोका

शंभर उंदिर खाउनि बोका,
काशीयात्रेला जाई
शंभर गोळ्या झाडुनि मंत्री,
करी उपोषण हा पाही

सैतानाच्या हातीं बायबल,
चोराच्या हातीं गीता
मंबाजी बैसला घेउनी,
संत तुकोबाची गाथा

साबरमतिच्या तीरावरती,
बकध्यान लावुनि ढोंगी
वैराग्याचा आव आणतो,
राख फासुनी सर्वांगीं

डोमकावळा करूनी आला,
रंगसफेती अंगाला
तसे आमुचे मोरारजी हे,
उपास यांनीं सुरू केला

धोंडे आणि दगड खाउनी
लोकप्रिय तो बहु झाला
पुन्हा एक तो बळी घेउनी,
उपास यानें संपविला

२ सप्टेंबर १९५६ —दत्तु बांदेकर

## किती किती सांगू तुला ग!

किती किती सांगू तुला ग!
मज चैन नसे ग!

ही दिवाळी नव्हे ग!
हा शिमगा खरा ग!
मम कर्मकथा ग!
हृदयांत व्यथा ग!

जगि झालें हसे ग!
नच कोणी पुसे ग!
अंडीं नि खेटरें ग!
किति खावीं बरें ग!

अंगाची आग आग!
होते पहा कशी ग!
हीं गुंड कारटीं ग!
मम धिंड काढिती ग!

मानव्य राखण्या ग!
केला उपास मीं ग!

येतो मनांत राग!
करणार काय मी ग!

जाऊं हिमालयीं ग!
दे दे बदाम दे ग!

४ नोव्हेंबर १९५६

—दत्तु बांदेकर

## किती किती सांगूं तुला ग!

किती किती सांगूं तुला ग!
मज चैन नसे ग!

ही दिवाळी नव्हे ग!
हा शिमगा खरा ग!
मम कर्मकथा ग!
हृदयांत व्यथा ग!

जगि झालें हसे ग!
नच कोणी पुसे ग!
अंडीं नि खेटरें ग!
किति खावीं बरें ग!

अंगाची आग आग!
होते पहा कशी ग!
हीं गुंड कारटीं ग!
मम धिंड काढिती ग!

मानव्य राखण्या ग!
केला उपास मीं ग!

येतो मनांत राग!
करणार काय मी ग!

जाऊं हिमालयीं ग!
दे दे बदाम दे ग!

४ नोव्हेंबर १९५६ —दत्तु बांदेकर

# मोरया तुझें, नांव चांगलें

मोरया, तुझें नांव चांगलें
भारतामध्यें फार गाजलें
करुनि मोरया, तूं उपोषण
दगड खाउनी, करिसी भाषण

मोरया, तुझें राज्य चांगलें
चोर गुंड हे, फार माजले
दारुबंदिचा, करुनि कायदा
करिसि आमुचा, तूंच फायदा

मोरया, तुझी गोळि चांगली
वर्मि लागुनी, घेतसे बळी
वृद्ध आणखी, बालकें स्त्रिया
यावरी न ती, करितसे दया

मोरया, तुझे मंत्रि चांगले
चप्पल खाउनी, फार भागले
स्वार्थ साधण्या, गाति आरती
घेऊनी तुला, रोज नाचती

१६ सप्टेंबर १९५६

—आचार्य अत्रे

## कर राक्षस !

नरराक्षस तो जरी मुरारी
कर राक्षस कृष्णम्माचारी
नरराक्षस तो बरा याहुनी
कारण मानवरक्तच घेई

कर राक्षस हा महाभयंकर
जें जें दिसतें तें तें खाई
गहूं, बाजरी, भाकर खाई
चहा, कॉफी अन् साखर खाई

गरिबांचा तंबाखू खाई
काडयाची पेटीहि खाई
कारकुनांचा पगार खाई
शेतकऱ्यांचें शिवार खाई

वडी साबणाची ती खाई
टपाल पोस्टाचेंही खाई
वनस्पतीचें तेलहि पचवी
पेट्रोलाची टाकी रिचवी

दाणावैरण कणीक कोंडा
चुना सिमेंट अन् माती धोंडा

जगड्व्याळ उदरांत मावलें
हातीं जें जें त्यास गवसलें

किंकाळी फोडीत चालली
बोगद्यांतुनी आगिनगाडी
ओकओकुनी धूर कोळसा
थरथर कांपत घेई वळसा

करराक्षस तो फार भुकेला
लोहरुळावर उभा ठाकला
बळें उचलुनी आगिनगाडी
दाढेखालीं खुशाल रगडी

अर्थमंत्रि हा नव्हे करंटा
देशावर फिरवी वरवंटा
कचेरींत मी बसलों येथें
लिहीत अपुलें असेंच कांहीं

करराक्षस तो डोळे मोडित
'दत्तू बांदेकरा'स पाही

२६ मे १९५७ —दत्तु बांदेकर

## म्हातारा इतुका न—

म्हातारा इतुका न। अवघें पाउणशें वयमान
मंत्री अजुनि लहान !

सफेत डोकें सफेत टोपी
सफेत तंग तुमान !
छापुनि येई छाप्यामध्यें
फोटो अमुचा छान !

दमा खोकला जर्जर तनुला
करी जरी हैराण,
भाषण करण्या अजून अंगीं
आहे थोडें त्राण !

पगार भत्ता फुकट बंगला
नाहिं कशाची वाण !
नवीन मोटर नोकर चाकर
मोसंबीं रसपान !
जसा मुंगळा गुळा चिकटला
तसेच आम्ही जाण;
सत्तेला चिकटून राहिलों
अखंड देउनि ठाण !

१५ जून १९५७

—दत्तु बांदेकर

# जाऊं गडावरतीं

जाऊं गडावरती—गड्यांनो—जाऊं गडावरती

शिवरायाचा प्रतापगड हा त्रिखंडांत कीर्ति
द्विभाषिकाला गाडायाला देईल तो स्फूर्ति
मनीं आठवा छत्रपतीची पवित्र ती मूर्ति
महाराष्ट्राच्या मानबिंदुची तेजस्वी ज्योति

शूर मराठे मर्द मावळे पोलादी छाति
सह्याद्रीच्या कडेकपारीं जागृत शिवशक्ति
सूर्याजी तो पिसाळ कोणी स्वार्थी मंदमति
या फितुरांना प्रतापगडची चारू या माती

कॉंग्रेसवाले कोळुनि प्याले सत्य आणि नीति
महाराष्ट्राची मानखंडना सदैव ते करिती
महाराष्ट्राचा पालनवाला हा शिवछत्रपति
द्विभाषिकाला गाडायाला देइल तो स्फूर्ति

जाऊं गडावरती—गडयांनो—जाऊं गडावरती.

१० नोव्हेंबर १९५७ —दत्तु बांदेकर

# रणरागिणी अहिल्या

रणरागिणी अहिल्या
सत्याग्रहा निघाली !
डोळ्यांत क्रांतिज्वाला
अन् वीरहास्य गालिं ! १

हातीं तिरंगि झेंडा
बाणा मराठमोळी
'जिंकीन मुंबई मी !'
हें ब्रीदवाक्य भाळीं ! २

वीरांगना मराठी
ही मूर्तिमंत बिजली !
येथें मुरारजीची
करणार काय गोळी ? ३

२२ एप्रिल १९५६

—आचार्य अत्रे

# उपवासी 'देव' माझा

उपवासी 'देव' माझा
सांगा कुणी पाहिला? ॥ ध्रु० ॥

जीर्ण मलिन पंचा ज्याचा,
बघुनि जीव धाला! १

बोट बोट दाढी ज्याच्या
शोभवीत गाला! २

राष्ट्रकार्यिं आंघोळीला
वेळ नाहीं ज्याला? ३

सदोबास बसतां जोडे,
व्यथित जो जहाला! ४

मारितो 'मुरारी' गोळ्या,
घालि त्यास डोळा! ५

हृदय नेहरूंचें बदलीन,
हाच ध्यास ज्याला! ६

स्त्रीवांचुन चिटणिस अपुला,
नेमिना कुणाला? ७

ब्रह्मचर्य रक्षण करण्या,
श्रमवि जो जिवाला! ८

गांधिंचें विडंबन करणें,
हाच एक चाळा! ९

महाराष्ट्र वैरी अंतरिं,
वरुनि सांभ भोळा! १०

२० मे १९५६

—आचार्य अत्रे

# अन्नम्वार ! कन्नम्वार !

अन्नम्वार ! कन्नम्वार !
महाराष्ट्राचा घातवार !
इकडे हा तुमपल्लीवार !
तिकडे कोणी जहन्नमवार !
सूर काढिती सदा अमंगळ
घुबडांचा चाले घूत्कार !

अन्नम्वार ! कन्नम्वार !
भांडवलदार ! कंत्राटदार !
मक्तेदार ! ठेकेदार !
बियानींचे साथीदार
तेजीमंदीचा व्यापार
महाराष्ट्राचीं छकलें करण्या
चोरांचा जमला बाजार !

अन्नम्वार ! कन्नम्वार !
वऱ्हाडाची लूटमार
विदर्भावरी डोळा फार
लुबाडिलें जनतेला पार
आज उडाला हाहाःकार
आटपला तुमचा दरबार
जाइल सत्ता, जाइल मत्ता

मिळेल लत्ता
म्हणून हे घाबरले फार!

अन्नम्वार! कन्नम्वार!
कशास रडतां वारंवार!
महाराष्ट्रावर करतां वार!
ऐका ऐका जयजयकार
तीन कोटिची एकजूट ही
करील तुमचा बेडापार!
अन्नम्वार! कन्नमवार!

२२ जुलै १९५६ —दत्तु बांदेकर

# शमीवरचीं शस्त्रें

*[ शमीच्या झाडावर काकांनीं लपवून ठेवलेल्या 'शस्त्रां'च्या रहस्याचा शेवटीं असा स्फोट झाला ! ]*

( चाल : गोकुळींचा कान्हा माझा )

शमिवरचीं शस्त्रें माझीं
 पाहिलींत काय हो ? ॥ध्रु०॥
उंच तिथें त्या ढोलींत
बांधुनिया मी फडक्यांत
ठेविलींत शस्त्रें गुपचुप
 नका कुणा सांगु हो ॥ १ ॥

भिऊं नका मर्द मराठे,
बसला हा काका येथें;
पाठीशीं अर्जुन असतां
 भीति तुम्हां काय हो ॥ २ ॥

लढूं मुंबईच्यासाठीं
मुंबईच्या रस्त्यांवरतीं
भारतीय युद्ध तुम्हांला
 फिरून आठवेल हो ॥ ३ ॥

'नको सुखी जीवन मातें,
मरण थोर लाभो माते !'

कर्ण म्हणे जें कुंतीला
मजसि हवें तेंच हो ॥ ४ ॥

योग्य वेळ आली जर का
नेहरूंना देईन धक्का !
मी 'नरां'तला 'हरि' आहें
विसरुं हें नका अहो ॥ ५ ॥

उठली तों उंच आरोळी—
'गेली हो मुंबई गेली' !
परि शमिच्या खालीं काका
शांत झोपीं जाई हो ॥ ६ ॥

तोंच कुणी घाई घाई
शमीवरतीं चढला 'भाई'
आणि जुना वस्तारा परि
करिं त्याच्या येई हो ॥ ७ ॥

"नसे नसे अर्जुन काका"
लोक मारिती मग हांका !
"या बृहन्नडेच्या हातीं
बांगड्या भरा किं हो" ॥ ८ ॥

४ मार्च १९५६ —आचार्य अत्रे

## अहमदाबाद ! अहमदाबाद !

अहमदाबाद, अहमदाबाद !
गांधी टोपी मुर्दाबाद !

दिली मराठी वीरांच्या
बलिदानाला ज्यांनीं साद
गुर्जर भूस्तव जे मेले
त्या शहिदांची ठेवा याद !

हौतात्म्याच्या नात्यानें
भाई भाई झाले आज
धन्य मराठी गुजराती
सरला त्यांचा आतां वाद

मोरारजींच्या फोटोची
होळीमाजीं झाली राख
वल्लभ-गांधींच्या नगरीं
काँग्रेसचा जिरला उन्माद !

साबरमतिच्या जलांतुनी
एकच उठला हा जयनाद !
महाद्विभाषिक हो बरबाद
गुर्जरभूमी झिंदाबाद !

अहमदाबाद, अहमदाबाद
गुर्जरभूमी झिंदाबाद !

१० ऑगस्ट १९५६ —आचार्य अत्रे

## सारनाथचे चार सिंह

सारनाथचे चार सिंह हे एका दिवशीं अपुले
स्तंभावरुनी उतरुन हिंडत घरांत असुच्या आले

अनाहून पाहुणे भयंकर घरांत अवचित शिरतां
सर्वांगाला भरे कांपरें अनर्थ का तो पुसतां
एकच मग आकांत उडाला पळूं लागले सारे
'धावा धावा' रडूं लागलीं स्त्रिया आणखी पोरें

फाडुन खातिल चार सिंह हे खास आम्हांला आतां
काय करावें प्रभो श्रीहरी एकच सकलां चिंता
लोकांची घबराट पाहुनी सिंह हासले गालीं
बोलुं लागले थंड वाणिनें शेपुट घालुन खालीं

"भितां कशाला अहो खुळ्यांनो, ऐकुन घ्या तरि असुचें
जात आमुची नीट ओळखा भाऊ आम्ही तुमचे
जरी सिंह ते असलों आम्ही तरी वेगळा पंथ
पूर्ण अहिंसावादी आम्ही श्वापदांतले संत

नाहीं ती आयाळ आम्हांला नाहीं एकहि दात
दंतहीन हा जबडा देखा सात्विक आणिक शांत
भाजीपाला अन्न आमुचें, डाळ रोटली शाक
खजूर केळीं भक्षण करतों पितों रोज तें ताक

ब्रह्मचर्य पाळतों घालतों शीर्षासनही रोज
शेळ्या-मेंढयांसंगें आम्ही खेळुन करतों मौज
कॉंग्रेसवाल्यांचें तें लक्षण असे आमुच्या अंगीं
एकच नाहीं बघा तेवढी कमरेला ती लुंगी"

बोल ऐकुनी त्या सिंहांचे लोक जाहले गार
धीर वाटला मनास आणि भीति गेली पार
हळू हळू मग गर्दी जमली सिंहांच्या भवतालीं
सिंहांचें अभिनंदन करण्या मुलेंहि धावुन आली

सारनाथचे चार सिंह हे असे विनोदी मोठे
हसवुन आम्हां बसले जाउन स्तंभावरती बेटे !

२७ मे १९५६ —दत्तु बांदेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 23423 वि: ........
दिनांक ........ नों. दि. 301725

# दिली फेकुनी खादी टोपी

दिली फेकुनी खादी टोपी
आजपासुनी खादी टोपी
खादी टोपी, ही बहु पापी

जी टोपी घालुनी शिरावर मोरारजी करि गोळीबार!
जी टोपी घालुनी सदोबा देशभक्तिचा करि व्यापार
जनताद्रोही काँग्रेसवाले जी टोपी धारण करिती
त्या टोपीचा विटाळ देवा, नको कदापि यापुढती
दिली फेकुनी खादी टोपी
खादी टोपी, ही बहु पापी!

ज्या टोपीनें देशामध्यें केलें अगणित अत्याचार
नक्षा उतरे त्या टोपीचा आज करी जनता धिक्कार
जी टोपी घालुनी मिरविती फलटणचे ते हरामखोर
ज्या टोपीचे वारस झाले गुंड मवाली आणि चोर
जी टोपी चढवून डोइला बोरकरदादा फिरतो आज
त्या टोपीला स्पर्श कराया वाटे आम्हांला हो लाज
दिली फेकुनी खादी टोपी
आजपासुनी ही बहु पापी

हिरे आणि चव्हाण तसे ते मालोजी-त्र्यंबक-मामा
महाराष्ट्राचा घात कराया ही टोपी आली कामा
रस्त्यावरती मुडदे पडले, या टोपीला त्यांचा शाप
अशा टोपिची संगत धरणें, याहुनि नाहीं दुसरें पाप

अशी हरामी खादी टोपी
ढेबरभाईची ही टोपी
लोकशाही वैऱ्यांची टोपी
दिली फेकुनी ही बहु पापी !

ज्या टोपीनें महाराष्ट्रावर गुजरातेवर केला वार
त्या टोपीचा नकोच आतां डोक्यावरती नसता भार
हिजला फेका, हिजला टाका, साबरमतिच्या नदींत टाका
हे माते साबरमती, वाहुनी हिजला ने परलोका
दिली फेकुन खादी टोपी
आजपासुनी खादी टोपी
खादी टोपी, ही बहु पापी !

२९ ऑगस्ट १९५६ —दत्तु बांदेकर

# आलखण पालखण

आलखण पालखण सदाशिवा
शेटाणि म्हणते, "पाटीलबुवा!
रामा करतो 'गनिमी कावा'
वांचवा मजला धावा धांवा—" १

पाटील म्हणतो, "ढसा ढसा
नको रडूं ग, उघड कसा!
भर माझा हा आधीं खिसा
मग लढतों मी पहा कसा!" २

शेटाणि म्हणते, "हवे तेवढे
घे रुपये, जा दिल्लिकडे!"
भरुन खिसा मग पाटिलबुवा
गुपचुप गेले अपुल्या गांवा! ३

—आचार्य अत्रे

## स्वागत बोरकरदादा

स्वागत बोरकरदादा
तुम्हांस लाभो दौलत जादा !

शुभ्र खादिचा वेष तनूवर
बदाम पिस्ते तोंडिं निरंतर
आत्मबळाचें तेज मुखावर
वंदन कॉंग्रेसदादा !

सोडयाची बाटली करीं ती
आत्मसंरक्षणासाठीं धरिती
सत्य अहिंसा सदा दाविती
वंदन बोरकरदादा !

४ ऑक्टोबर १९५२ —दत्तु बांदेकर

# आरती गणपतीची

सुखकर्ता दुखहर्ता वार्ता गोव्याची।
भारतियांना बंदी सत्याग्रहाची।
मुत्सद्देगिरी बघुनि अद्भुत दिल्लीची।
सालाझार खाई बर्फी मेव्याची।
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती।
वाटाघाटीसाठीं देई तूं स्फूर्ती ॥ १ ॥

मुंबई शहरामध्यें पाऊस फार।
उत्सवमंडप गळतो पाण्याची धार।
भिजले कार्यकर्ते झाले बेजार।
नकलांचे गाण्यांचे कार्यक्रम गार।
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती।
रामराज्यामध्यें गुंडांचीं भरती ॥ २ ॥

देशामध्यें क्लेश नाना अपार।
गंगा ब्रह्मपुत्रा नद्यांना पूर।
मंत्र्यांचीं भाषणें होती सुंदर।
भाषावार राज्यें लांबणीवर।
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती।
सदोबांचा डोळा मुंबईवरती ॥ ३ ॥

रेशन गेलें आतां अन्नसुकाळ।
नैवेद्याची देवा झाली चंगळ।

खिशांत नाहीं दमडा वाणी प्रेमळ।
उधार देई तूप लोणी मेसळ।
जयदेव जयदेय जय मंगलमूर्ती।
पुण्यांत: घाटे माटे भांडण करिती ॥ ४ ॥

पंचवार्षिक योजनेचा विस्तार।
मंत्र्यांचे जावई कंत्राटदार।
अर्धपोटी जगती अगणित बेकार।
पार्वतीच्या तनया जनतेला तार।
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती।
भेटा देवा आतां चौपाटीवरती ॥ ५ ॥

—दत्तु बांदेकर

५ सप्टेंबर १९५४

# द्विभाषिक राज्याचीं गाणीं

## १

(चाल : नका टाकून जाऊं डावा डोळा)

ना रे तजीने जाऊ डावा डोळा
पाण्यानें मारा भर्यु रे ॥
तारा माटे, घणुं मी झुरतें
व्हाला, लाग्यू रे घोर जिवाला ॥
बा तमारी, सासु मारी
व्हालो, घुस्सा करता ना रे मजला ॥

## २

(चाल : सकाळीं उठोनि देवासी भजावें)

सवारे उठीने, देवासी भजावें
गुरूने नमीजे, जीवें भावें ॥
बापुजीनी आज्ञा घेतल्यावांचुनी
कुठें घरमाथीं जतां नहीं ॥
नेमियल्या वेळीं, निशाळ जजोरे
ध्यान सदा आपो, पाठाकडे ॥
रस्तामाथीं जाता भवाई जोता ना
वचमा कोठेही, थाभो नये ॥

१६ ऑक्टोबर १९५५ —आचार्य अत्रे

# हे कोण बोलले बोला

हे कोण बोलले बोला,
ढळढळा सदोबा रडला ॥ ध्रु० ॥

दुर्दैवनगाच्या शिखरीं
नवदुःखी काँग्रेस बैल
निवडणुकींत त्या बैलाचे
झाले कीं फारच हाल
काँग्रेसचा वाजे बोऱ्या
चोळीत बैसला गाल
तो मठ्ठ बिचारा प्राणी
डोळ्यांत आणुनी पाणी
सांगे निज कर्मकहाणी
ओरडून सांगे सकलां,
ढळढळा सदोबा रडला ॥ १ ॥

संयुक्त महाराष्ट्राचा,
दशदिशांत जयजयकार
मुंबई महाराष्ट्रांत,
समितीचा प्रचंड जोर
काँग्रेसच्या बैलोबांना
सणसणीत बसला मार
हा बोरकरदादा पडला

तो किसनवीर गडगडला
तो प्रतापसिंग उडाला
लावुनी हात भाळाला
ढळढळा सदोबा रडला ॥ २ ॥

त्या पुण्यांत चारी मुंडे,
थापाडे काका चीत
ते सणस आणि बू साठे
बैसले ऊर बडवीत
समितीच्या नरवीरांनीं,
कॉंग्रेसवर केली मात
तूं धन्य मराठी मर्दा
कॉंग्रेसचा केला खुर्दा
हा द्विभाषिकाचा मुडदा
हादरा बसे दिल्लीला,
ढळढळा सदोबा रडला ॥ ३ ॥

REFBK-0010043
REFBK-0010043

१७ मार्च १९५७ —दत्तु बांदेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 23423 किं: 3.05
क्रमांक 9811 नों: दि: 30/2/95
मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र. 90083.

ग. पां.
परचुरे प्रकाशन मन्दिर